☏- 02462-244474, 234504
फॅक्स क्रं. - 02462-235103

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

नियंत्रण कक्ष ☏ - 02462-234720
E-mail Id- sp.nanded@mahapolice.gov.in, pronanded@gmail.com

जा.क्रं./ प्रेस नोट / 273 / पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड /2025 / दिनांक : 09 / 07 / 2025

# 1)दरोडयाची तयारी :–

**भोकर** :–दिनांक 08.07.2025 रोजी रात्री 00.15 वा. चे सुमारास, **पोमनाळा ते सावरगाव फाटा जाणाऱ्या रोडवर मौ. सोनारी शिवारातील रस्त्यावर ता. भोकर जि. नांदेड येथे,** आरोपी नामे 1.गजानन उर्फ बाळा वसंत जळते, वय 24 वर्षे, 2. उमेश गुणाजी आठवले, वय 19 वर्षे, 3. विठ्ठल उर्फ विक्रम देवानंद सावते, वय 19 वर्षे, 4.कृष्णा यशवंत पवार, वय 20 वर्षे, रा. बारड ता. मुदखेड 5. अजिंक्य गोविंदे, वय 20 वर्षे, रा. खैरगांव 6. एक विधीसंघर्ष बालक, यांनी संगणमत करून दरोडा टाकण्याच्या ईराद्याने पुर्व तयारी करून घातक शस्त्र व साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/2078 बालाजी सोनाजी लक्षटवार, ने. पोस्टे भोकर** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे भोकर** गुरनं 353/2025 कलम 310(4),भारतीय न्याय संहिता–2023 सह कलम 4/25 भारतीय हत्यार कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री जाधव, मो. नं. 9022799785** हे करीत आहेत.

# 2)गंभीर दुखापत :–

**अर्धापुर** :–दिनांक 07.07.2025 रोजी संध्याकाळी 18.30 वा. चे सुमारास, **मौ. सावरगाव टी पॉईंट ता. अर्धापुर जि. नांदेड येथे,** यातील आरोपी नामे 1.मनोज गंगाराम मगरे, वय 40 वर्षे, 2. सचिन गंगाराम मगरे, वय 35 वर्षे, इतर दोन सर्व रा. दिग्रस ता. अर्धापुर यांनी संगणमत करून फिर्यादीस जुन्या भांडणाचे कारणावरून शिवीगाळ करत प्रथम थापड बुक्याने मारहाण करून लाकडी काठीने फिर्यादीचे डोक्यात मारून व उजव्या हातावर मारून फ्रॅक्चर करून गंभीर दुखापत केली व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी लिंबाजी शंकरराव कंधारे, वय 32 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. आकोली ता. वसमत जि. हिंगोली,** यांचे फिर्यादीवरुन **पोस्टे अर्धापुर** गुरनं 401/2025 कलम 117(2), 115(2),352, 351(2)(3), 3(5) बीएनएस–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1279 चव्हाण,** मो.नं. 9356283117 हे करीत आहेत.

# 3)शासकीय आदेशाचे उल्लंघन :–

**माहुर** :–दिनांक 08.07.2025 रोजी 16.20 वा. चे सुमारास, **बसस्थानका जवळील राजश्री लॉज माहुर ता. माहुर जि. नांदेड येथे,** यातील आरोपी नामे 1.गणेश, दयाराम जोशी, वय 42 वर्षे, व्यवसाय लॉज मालक रा. माहुर 2.अनिल माधव गंजेवार, वय 27 वर्षे, व्यवसाय लॉज मॅनेजर रा. नखेगाव ता. माहुर जि. नांदेड यांनी राजश्री लॉज मध्ये येणारे लोकांची रजिस्टरमध्ये नोंदी न घेता रूम उपलब्ध करून दिल्या त्यामुळे नोंदणी न करता रूम दिलेल्या लाकांकडुन घातपाताचे प्रकार घडुन शहरात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊन लोकांची सुरक्षीतता धोक्यात येवु शकेल अशी कृती करून शासकीय लोकसेवकाने दिलेल्या आदेशाचे उल्लंघन केले. वगैरे **फिर्यादी पोकॉ/2002 ज्ञानोबा पंढरीनाथ खंदारे, ने. पोस्टे माहुर** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे माहुर** गुरनं 112/2025 कलम 223, 3(5) बीएनएस–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ**/1326 चौधरी, **मो.क्रं. 9158134034** हे करीत आहेत.

# 4)भारतीय हत्यार कायदा :–

**लिंबगाव** :– दिनांक 08.07.2025 रोजी 03.10 वा. चे सुमारास, **बोरगाव फाटा ता. जि. नांदेड येथे,** यातील आरोपी नामे शुभम जालीदंर दवणे, वय 22 वर्षे व्यवसाय चालक रा. आंबेडकरनगर हा विना परवाना बेकायदेशिररित्या तलवार आपले ताब्यात बाळगलेला मिळून आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/1271 अतुल नागनाथराव सातारे, नेमणूक पोस्टे लिंबगाव** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे लिंबगाव** गुरनं 114/2025 कलम 4/25 भाहका प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2304 टोम्पे, मो.क्रं. 9823262304** हे करीत आहेत.

# 5)गळफास घेवुन आत्महत्या :–

**माळाकोळी** :–दिनांक 08.07.2025 रोजी 07.00 वा. चे पुर्वी, **मौ. दगडसांगवी मयताचे शेतात ता. लोहा जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे तिरूपती दत्ता बोराडे, वय 35 वर्षे रा. दगडसांगवी ता. लोहा जि. नांदेड** यांनी कर्जबाजारीपणास कंटाळुन स्वतःचे शेतातील चिंचेचे झाडाला गळफास घेवून आत्महत्या केली. वगैरे **खबर देणार हौसाजी दत्ता बोराडे, वय 38 वर्षे, रा. दगडसांगवी ता. लोहा जि. नांदेड** यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे माळाकोळी** आ. मृ. **26**/2025 कलम 194 बीएनएस–2023 कायदा प्रमाणे दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री बोंबले, मो.नं. 7218820579** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी,**
पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड